सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ साठी रू.२२१,२८,१४,८००/- (अक्षरी रुपये दोनशे एकवीस कोटी अठ्ठावीस लाख चौदा हजार आठशे फक्त) इतका निधी वितरित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक : कृवपदुम-१९०४६/३१/२०२६/MAG-८A (E-१६१७९७५)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०२ जुलै, २०२६

**संदर्भ :-**

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.३०.०६.२०२३

२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२४/प्र.क्र.८२/८-अे, दि.०३.०९.२०२४

३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.१४.१०.२०२४

४) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२४/प्र.क.२०४/८-अे, दि.०७.०१.२०२५

५) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.कृवपदुम-१९४६/३६/२०२५/MAG-८A (E-११६८०५०), दि.०८.०७.२०२५

६) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.कृवपदुम-१९४६/१३/२०२५/MAG-८A (E-१२०७१४५), दि.०५.०८.२०२५

७) वित्त विभागाचे शासन परिपत्रक, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२५, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६

८) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्र. कृवपदुम-१९०४५/१८/२०२६/MAG-८A (E-१६१२९७२) दि.१२.०५.२०२६

९) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्र. कृवपदुम-१९०४६/३१/२०२६/MAG-८A (E-१६१७९७५) दि.१४.०५.२०२६

१०) प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र क्र.NDKSP १३०८०(३५)/४/२०२५-१३/E-२६३७५६६, दि.१९.०५.२०२६ व दि.२१.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशीव, लातूर, नांदेड, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव व नाशिक या २१ जिल्ह्यांतील निवड केलेल्या ७२०१ गावांमध्ये जागतिक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर प्रकल्प सन २०२५-२६ पासून पुढील सहा वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी बाह्य हिश्श्याच्या लेखाशिर्ष २४०१ B५३५ (७०%) अंतर्गत रु.३०९.४० कोटी व राज्य हिश्श्याच्या लेखाशिर्ष २४०१ B५४४ (३०%) अंतर्गत रु.१३२.६० कोटी

अशाप्रकारे एकूण रु.४४२.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. संदर्भ क्र.८ व ९ येथील शासन निर्णयान्वये आतापर्यंत एकूण रु.४१,३९,७३,६००/- (अक्षरी रुपये एकेचाळीस कोटी एकोणचाळीस लाख त्र्याहत्तर हजार सहाशे फक्त) इतका निधी प्रकल्पास वितरीत करण्यात आला आहे.

संदर्भ क्र.७ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये सन २०२६-२७ साठी महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२५ नुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे निधी वितरण निश्चित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.१० अन्वये प्रकल्प कार्यालयाकडून निधी वितरणाबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांना रू.२२१,२८,१४,८००/- (अक्षरी रुपये दोनशे एकवीस कोटी अठ्ठावीस लाख चौदा हजार आठशे फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी एकूण रू.२२१,२८,१४,८००/- (अक्षरी रुपये दोनशे एकेवीस कोटी अठ्ठावीस लाख चौदा हजार आठशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. याबाबतचा लेखाशिर्षनिहाय व उद्दिष्टनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | लेखाशिर्ष | लेखा उद्दिष्ट | वितरीत निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मागणी क्र.डी-३,<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(११५) लहान/सीमांत शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची योजना,<br>(००) (०८) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ (हवामान अनुकूल कृषि प्रकल्प टप्पा-२)<br>राज्य हिस्सा (३०%) (कार्यक्रम), २४०१ B५४४ | १७-संगणक खर्च | ३१.११ |
| | | २६-जाहिरात व प्रसिध्दी | २४.८८८० |
| | | ३३-अर्थसहाय्य | ३५०५.१५ |
| २ | मागणी क्र.डी-३,<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(११५) लहान/सीमांत शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची योजना,<br>(००) (०७) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ (हवामान अनुकूल कृषि प्रकल्प टप्पा-२)<br>बाह्य हिस्सा (७०%) (कार्यक्रम), २४०१ B५३५ | ३३-अर्थसहाय्य | १८५६४.०० |
| | **एकूण** | | **२२१२८.१४८** |

२.  सदर निधी उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.२ येथील प्रकल्पाच्या राज्य व बाह्य हिश्श्याच्या लेखाशिर्षांतर्गत तक्त्यातील स्तंभ क्र.३ येथील उद्दिष्टाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

३.  या शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी आणि वित्त विशेषज्ञ, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४.  या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा विहित पद्धतीने तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांनी उपरोक्त लेखाशीर्षाखाली/उद्दिष्टाखाली खर्च झालेल्या रक्कमांचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास सादर करावे.

५.  प्रकल्प संचालकांनी सदर प्रकल्पांतर्गत खर्ची पडणाऱ्या निधीची जागतिक बँकेकडून सत्वर प्रतिपूर्ती मिळवावी व मिळालेल्या प्रतिपूर्तीबाबत शासनास वेळोवेळी अहवाल पाठवावा.

६.  प्रकल्प संचालकांनी सदर प्रकल्पांतर्गत झालेल्या कामांचा प्रगती अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

७.  सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.०७ येथील शासन परिपत्रकानुसार प्रशासकीय विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३०८/२०२६/व्यय-१, दि.१२.०६.२०२६ अन्वये मिळालेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०२१२५०४८४१०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.07.02 12:51:33 +05'30'

**( भुपेश अ.कोळी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई

३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (कृषि ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प, मुंबई
९. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (लेखा व अ नुज्ञेयता), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१४. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१५. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-१/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
१७. नियोजन विभाग (का.१४३१), मंत्रालय, मुंबई
१८. कक्ष अधिकारी (कार्यासन २-अे), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
१९. निवड नस्ती (का.८अे).